# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

**Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere**

(Established by Government of Maharashtra and Governed by Dr. Babasaheb Ambedkar Technological University Act No. XXIX of 2014)

विद्याविहार, लोणेरे-रायगड ४०२ १०३ (महाराष्ट्र) Vidyavihar, Lonere - Raigad 402 103 (Maharashtra)

Tel: (02140) 275142 Student Helpline: 02140 - 275212

Website: www.dbatu.ac.in, E-mail: registrar@dbatu.ac.in

**Dr. Bhagawan F. Jogi**
**Registrar**

**डॉ. भगवान फ. जोगी**
**कुलसचिव**

क्रमांकः डॉबाआंतंवि/आस्था/दिर्घसुट्टी(उन्हाळी)/२०२२/1023

दिनांकः २३/०६/२०२२

## परिपत्रकः

**विषय** : शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ च्या दिर्घसुट्टीस (उन्हाळी) पात्र असणा-या कर्मचा-यांना दिर्घसुट्टी जाहीर करण्याबाबत.

संदर्भ : आस्थापना विभागाच्या दिनांक ०८/०६/२०२२ रोजीच्या सादरला मा. कुलगुरु यांची मान्यता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील दिर्घसुट्टीस पात्र असणा-या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांना दरवर्षी उन्हाळी व हिवाळी दिर्घसुट्टी जाहिर करण्यात येते. परंतू कोवीड-१९ च्या प्रार्दुभावामुळे सर्वच शैक्षणिक वेळापत्रकात बदल झाला आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या शैक्षणिक दिनदर्शिकेमध्ये दिर्घसुट्टीचा कालावधी नमुद केलेला नसल्यामुळे वरील संदर्भान्वये मा. कुलगुरुंच्या मान्यतेने सदर ४० दिवसांची उन्हाळी दिर्घसुट्टी दिनांक २५/०६/२०२२ ते ०४/०८/२०२२ या कालावधीमध्ये जाहिर करण्यात आली आहे.

दिर्घसुट्टी कालावधीत सर्व विभाग प्रमुखांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. तथापि अपवादात्मक परिस्थितीत विभागप्रमुखांना दिर्घसुट्टीच्या काही कालावधीत उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी मा. कुलगुरुंच्या पूर्वपरवानगीने विभागातील दुस-या सेवाजेष्ठ अध्यापकाकडे विभागप्रमूख पदाचा तात्पुरता कार्यभार सोपवावा तसेच याबाबत कुलसचिव यांना लेखी कळवावे.

दिर्घसुट्टी कालावधीत वेगवेगळया विभागात शैक्षणिक व तत्सम कामाकरिता काही अध्यापक व शिक्षक सहाय्यक कर्मचा-यांना थोपवून धरणे आवश्यक असल्यास कामाबाबत सविस्तर माहिती तपशिलासह विहित नमुन्यात कार्यालयात सादर करावी. तसेच दिर्घसुट्टीवरुन आल्यानंतर दिनांक १२/०८/२०२२ पर्यंत प्रत्यक्ष केलेल्या कामाचा अहवाल सादर करावा.

(डॉ. भगवान फ. जोगी)
कुलसचिव

प्रति,
सर्व विभागप्रमुख व विभाग नियंत्रक

प्रतः माहितीसाठी
मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे.